# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 11/01/2019 (शुक्रवार)
# (सकाळ)

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 15 कि.मी. अंतरावर पंचाळा शिवार येथे दिनांक 10/01/2019 चे 08.45 वा. ते 09. 45 वा. दरम्यान एमएच–40/एडब्लु– 1226 क्रमांकाचा ट्रॅक्टर व विना क्रमांकाची ट्रॉलीचा चालक आरोपी नामे– 1) मनिष सुक्षदेव कुंभरे, वय 26 वर्ष, रा. उमरी व 2) पिंटु दयाराम चौके (मालक), रा. मुरडा यांनी संगणमत करून त्यांच्या ताब्यातील वाहनात विना परवाना अवैद्यरित्या 1 ब्रास रेती किंमती 3,000/–रु. भरून वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातून वाहन व रेती असा एकुण कि. 2,03,000/–रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे सहायक फौजदार बमनोटे, उपविभागीय कार्यालय रामटेक यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपी क्र. 1 ला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार नुरीया हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर एमआयडीसी कळमेश्वर येथे दिनांक 06/01/2019 चे 17:30 वा. दिनांक 09/01/2019 ते 10:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अक्रम सलीम शेख, वय 30 वर्ष, रा. दत्त नगर वार्ड क्र. खापरखेडा हे दिनांक 09/01/2019 चे 10.30 वा. कामावर आले तेव्हा त्यांना एटीएसचे शटर उघडे दिसले. अज्ञात आरोपीने तेथे ठेवलेली अमराजा 600 एएच कंपनीची 24 सेलची बॅटरी कि. 50,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी विरूद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार यादव हे करीत आहे.

# अपघातात मृत्यु

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत मौजा पालोरा रोडजवळ येथे दिनांक 01/01/2019 चे 07:30 वा. दरम्यान फिर्यादीचा लहान भाऊ नामे– महेश योगेश्वर येवुतकर, वय 24 वर्ष, रा. पारशिवनी हा मित्राची मोटरसायकलने पारशिवनी कडे जात होते. दरम्यान अज्ञात आरोपी वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन महेश येवुतकर यांच्या मोटरसायकलला धडक दिली. या अपघातात महेश येवुतकर हा गंभीर जखमी झाल्यानंतर मेडीकल कॉलेज नागपूर येथे दिनांक 02/01/2019 चे 03.30 वा. त्याचा मृत्यू झाला. संबधीत कागदपत्रे प्राप्त झाल्यावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राहुल योगेश्वर येवुपतकर, वय 27 वर्ष, रा. वार्ड क्र. 12, पारशिवनी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार वरखडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर